स्थापना :- दि. २० जून १९२०, रजि. नं. २९६६

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे-११

बंगला नं.३, पोलीस अधिकारी वसाहत, सोमवार पेठ पोलीस लाईन, पुणे-११.
मो नं. ७७२०००५६७, Email : info@thepunepolicesociety.com

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२५-२६ सालाकरीता १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता **''पोलीस संशोधन केंद्र (सी.पी.आर), ऑडीटोरियम हॉल''** डॉ. होमी भाभा रोड, बाणेर-पाषाण लिंक रोड, पाषाण, पुणे-४११००८, येथे आयोजित केलेली आहे. तरी सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**सदर सभेत पुढील विषयाप्रमाणे कामकाज होईल.**

### ❊ सभेपुढील विषय ❊

१) मागील दिनांक ०६/१०/२०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) शासकीय लेखापरीक्षक यांचे दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरच्या तपासणी अहवालाची माहीती घेणे व दोष दुरुस्ती पत्रकाची नोंद घेणे.

३) दिनांक ३१/०३/२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील या संस्थेच्या कामकाजाचा अहवाल, जमा-नावे पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक व सन २०२६-२७ सालचे अंदाजपत्रक स्वीकृत करणे.

४) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

५) परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे.

६) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहिलेल्या सभासदांना क्षमापित करणे.

७) सन २०२६-२७ सालाकरीता मा. शासकीय / वैधानिक लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे.

८) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थांसाठी नवीन सुधारीत आदर्श उपविधी २०२६ संस्थेस लागू करुन, अद्ययावत करण्यास मंजुरी मिळणेबाबत.

९) संस्थेच्या सभासदांना सुरक्षा कवच (अपघात विमा) सुरु करण्याकरीता माहिती घेवून निर्णय घेणे.

१०) संस्थेचे सभासदांचा ग्रुप आरोग्य विमा काढणेबाबत माहिती घेवून निर्णय घेणे.

११) मा. अध्यक्ष सो. यांच्या पूर्वपरवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर विचार करणे.

(जमीर तांबोळी)
मानद सचिव
दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप.
क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे -४११०११.

स्थळ : पुणे
दिनांक : २९/०५/२०२६